


# नवनीत

मे २०१३

# मुखपृष्ठाविषयी

या नवनीतच्या मुखपृष्ठ व मलपृष्ठावर जी चित्रे आहेत त्यांना रिलीफ प्रिंट असे म्हटले जाते. या प्रकारची चित्रे शिकण्यासाठी आमच्या शाळेत प्रिंट मेकिंग या विषयाची कार्यशाळा झाली. पहिल्याच दिवशी प्रिंट मेकिंगची माहिती देऊन रिलीफ प्रिंट कशी काढायची हे अक्षयदादाने शिकविले. नंतर आम्ही सर्व मुले चित्र काढायला बसलो. पण प्रिंटसाठी चित्रे कशी पाहिजेत हे कोणाच्याही लक्षात येत नव्हते. दादाने मुलांची चित्रे पाहिल्यावर त्यासाठी कसे चित्र लागते ते प्रात्यक्षिक करून दाखवले. मग मी पण चित्र काढले व ते दाखवून दादाकडून तपासून घेतले आणि ब्लॉक करायला सुरूवात केली. मी एका कुत्र्याचा व एका डोळ्याचा ब्लॉक तयार केला. बाकी सर्व मुलांनी पण ब्लॉक तयार केले आणि कार्यशाळेचा पहिला दिवस इथेच थांबला.

दुसऱ्या दिवशी मुलांचे गट करण्यात आले. मी शेवटच्या गटात असल्याने मला खूप फायदा झाला कारण पहिल्या गटांना प्रिंट मेकिंगचे काम करताना ज्या अडचणी आल्या त्याबद्दल दादा आम्हाला सूचना देत होता. त्यामुळे मला वेळीच सुधारणा करता आल्या. माझ्या मैत्रिणीने, दिव्याने कागदावर प्रिंट घेताना थोडेसे प्रेस करून संपूर्ण कागद उचलला. त्यामुळे चित्र बिघडले. माझ्या दुसऱ्या मैत्रिणीच्या ब्लॉकवर फेविकॉलचा थर नीट न बसल्याने माउंटबोर्डचा कागद रोलरला चिकटून आला त्यामुळे रोलर पुन्हा साफ करावा लागला. नंतर अशा अनेक अडचणी लक्षात आल्याने सर्वांनी आपली दुसरी प्रिंट कशी चांगली येईल याची काळजी घेतली.

माझे हेही काम लवकर झाल्याने मी चित्रांच्या एकूण पाच प्रिंट घेतल्या. हे काम करताना असे लक्षात आले की कोणतेही काम करताना खुप चिकाटीची गरज असते आणि घाई न करता धीर धरून काम केले पाहिजे तरच त्याचा निकाल चांगला लागतो.

संध्याकाळी सर्वांच्या चित्रांचे प्रदर्शन मांडण्यात आले. त्यामुळे सगळ्यांची चित्रे बघता आली. या कार्यशाळेतून चित्राचा आणि प्रिंटचा हा नवीन प्रकार शिकायला खूप मजा आली.

**जिऊ निमकर, इ. ५ वी.**

प्रगत शिक्षण संस्था, फलटण
वार्षिक पत्रिका

# नवनीत

मे २०१३

**संपादकीय सहाय्य**
मंजिरी निमकर
मधुरा मणेर
प्रकाश अनभूले

**रेखाचित्रे**
अर्चित परूळेकर, ओंकार मगर
प्राजक्ता माने, मृणाल खाडे
प्रणाली ओतारी

**मुखपृष्ठ**
बसः सिध्दांत निकाळजे
**मलपृष्ठ**
संत्र्याची संसदः वैष्णवी महामुनी

**रेखाटन मार्गदर्शक**
सुशांत अहिवळे
कल्पिता दंडवते

अनेक कथा व कवितांची चित्रे त्या-त्या लेखक व कवींनी काढलेली आहेत.

**प्रकाशन** : प्रगत शिक्षण संस्था, रिंगरोड, फलटण ४१५ ५२३.
**संगणकीय अक्षरजुळणी** : अपर्णा टाकसाळकर, प्रकाश अनभूले
**फोन** : ०२१६६-२२३०४१
**email** : pragatshikshansanstha@gmail.com
**website :** www.pragatshikshansanstha.org

# अनुक्रमणिका

प्रस्तावना/मंजिरी निमकर/iii
माझे गाव- उगळेवाडी/प्रजय शिंदे, २ री/१
शकू आणि तिची माय/संजना रिटे, १ ली/२
कितीतरी दिवसात, मित्र, क्रिकेट/ऋतुजा सावंत,अपेक्षा सिधये, तन्मय मोरे, ४ थी/३
तिळसे/तन्मय मोरे, ४ थी/४
कोशिंबीर झाली मस्त, मुलांनी केली फस्त/अनुजा अहिवळे, ४ थी/५
पाखरांची शाळा, पतंग/परीक्षित विशे, ४थी, ऋतुजा इंगळे, ७वी/७
हृदयाला पत्र, चंद्राच्या घरी/गायत्री, अविरत कचरे, ३ री, अमित कदम, ३ री/८
पिताजी को पत्र, फूल/एक बेटी, आर्या पाटील, ४ थी/१०
डॉल्फिन की सवारी/प्राजक्ता, श्रुती, अभिनव, सोहम, ६ वी/११
वासाच्या मागावर/अक्षदा फणसे, ७ वी/१३
मेरा अविस्मरणीय क्षण/ प्रथमेश नलवडे, ८ वी/१५
नोटेची कमाल/ऋषिकेश निंबाळकर, ७ वी/१६
ऱ्हास पृथ्वीचा/ओंकार मगर, ७ वी/१८
नको-नको/श्रीया पाटील, ३ री/१९
भुतांची पंगत/राहुल राऊत, ७ वी/२०
आजी/ओंकार मगर, ७ वी/२१
मासेमारी/ऋतिक माने, ७ वी/२२
खारीचे पिलू/मयूर गायकवाड, ८वी/२४
कविता/शरयू फणसे, ७ वी/२५
गप्पांचा अड्डा/प्रियांका, समीक्षा, सायली, काजल, रुक्सार, गितांजली, ८वी/२६
पूर्व संचित/प्रथमेश इनामदार, १० वी/२७
दिदी/अनुजा अहिवळे, ४ थी/३१
ठशांच्या शोधात/अदिती माने, ८ वी/३२
धुमारे, रात्र/प्रांजली भुजबळ, अक्षता मगर, १० वी/३५
Snakes/Gauri Swami, 8th/३६
The Mango Thief/Aishwarya Teli, 9th/३७
Home Alone/Rutuja Shinde, 8th/३८
My First Railway Journey/Kedar Patrekar, 9th/३९

# प्रस्तावना

नवनीतचा २०१३ चा अंक वाचकांच्या हाती देताना आम्हाला मोठा आनंद होतो आहे. शाळांमध्ये सुरू झालेल्या सातत्यपूर्ण, सर्वंकष मूल्यमापनामुळे मुले भाषा-शिक्षणाच्या साचेबध्द अभ्यासातून मुक्त झाली आहेत. १०० गुणांच्या परीक्षांच्या दडपणातून मोकळी झाली आहेत. नव्या, वाचनाच्या, शोधाच्या, प्रयोग करण्याच्या अधिक संधी त्यांना मिळत आहेत आणि म्हणून त्यांच्या सृजनालाही पंख फुटले आहेत. या अंकातील मुलांचे लेखन वाचून तुम्हाला याची सत्यता पटेल.

पहिलीच्या संजनाची 'शकू आणि तिची माय' असो की दुसरीतल्या प्रजयची 'उगळेवाडी' असो, अक्षर ओळख जरी नवी असली तरी सृजनाच्या वाटेवर आपण खूप दूर पोचलो आहोत हे या दोघांनी दाखवून दिले आहे. तिळसे, ऱ्हास पृथ्वीचा व खारीचे पिलू या लेखांमधून मुलांच्या मनातील पर्यावरण प्रेम दिसून येते. भुतांची पंगत मध्ये राहूलने गावाकडच्या लोकांची एक अख्यायिका कथेत उतरवली आहे.

गावाकडच्या मुलांचे बालपण आजच्या धकाधकीच्या जगातही किती निरागस असते व साध्या साध्या गोष्टींमधून आनंद मिळविण्याची त्यांची क्षमता किती प्रचंड असते ते समजते मासेमारी, वासाच्या मागावर, मेरा अविस्मरणीय क्षण व My First Railway Journey या लेखांमधून. टी. व्ही., व्हीडीओ गेम्स, मॉल्स यांच्यापासून कोसो दूर, निसर्गाच्या सानिध्यात किती मजा येते हे सांगतो आदितीचा सहलीचा अनुभव 'ठशांच्या शोधात', तर 'मुलगाच हवा' चे विदारक सत्य चटका लावून जाते एका बेटीने लिहिलेल्या 'पिताजी को पत्र' या लेखात.

लहान मुलांना असणारी कामाची आवड आणि मित्र-मैत्रिणींनी मिळून केलेल्या कामातील आनंदाचे वर्णन अनुजाचा कोशिंबीरीचा लेख करतो. तसेच लहान मुलांच्या आपले शरीर व त्याचे कार्य याबद्दलची समज आपल्याला कळतात हृदयास इयत्ता चौथीने लिहिलेल्या पत्रांमधून.

डॉल्फिन की सवारी ही पूर्ण काल्पनिक कथा आपल्या हिंदीतील प्रकल्पाच्या वेळी एका गटाने लिहिली. तसेच गप्पांचा अड्डा ही कविताही शाळेच्या वार्षिक प्रकल्पादरम्यान आठवीतील सहा मैत्रिणींनी मिळून केली.

धुमारे व रात्र या दोन कवितांमध्ये अत्यंत संवेदनशील तरूण मनाचे प्रतिबिंब दिसते. शरयूची कविता कवितेच्या जन्माची मेख सांगते. तर लहानग्यांच्या नको-नको, कितीतरी दिवसांत, मित्र, क्रिकेट, चंद्राच्या घरी, पाखरांची शाळा, दिदी या कविता वाचकाला ताज्यातवान्या करतात.

विशेष उल्लेख करावासा वाटतो तो प्रथमेशच्या 'पूर्व संचित' चा. वेगवेगळ्या विषयांवर प्रगल्भ लेखन करणारा प्रथमेश यंदा शाळा सोडून जाणार. त्या निमित्ताने त्याच्याकडून मुद्दाम लिहून घेतलेला हा लेख फारच हृदयस्पर्शी झाला आहे.

जागेअभावी अनेक कथा, कविता, लेख दरवर्षी परत करावे लागतात. तरीही पुढील वर्षी तितक्याच उत्साहाने पुन्हा नवनवीन साहित्य मिळत राहते. हा क.नि.बा.च्या सृजनाचाच पुरावा आहे.

**डॉ. मंजिरी निमकर**

# माझे गाव-उगळेवाडी

**प्रजय शिंदे**

**इ. २ री**

वारुगडामधील उगळेवाडी हे माझे गाव आहे. गाव खूप लहान आहे. फलटणहून उगळेवाडीला जाताना वळणावळणाचा रस्ता आहे. हे गाव डोंगरावर आहे. उगळेवाडीला जाताना दऱ्याखोऱ्यातून जावे लागते. गावाचा रस्ता कच्चा आहे. गावात आल्यावर थंडगार हवा लागते. गावात खूप झाडे आहेत.

गावातली घरे कौलाची व शेणानी सारवलेली आहेत. चावडीशेजारी माझे घर आहे. चावडीत मुले सर्व खेळ खेळतात. आमच्या घरी दोन बैले आहेत. ती बैले दादाप्पा सांभाळतात.

गावात रामाचे व मारूतीचे मंदिर आहे. मंदिरात माणसे भजन म्हणतात व झोपतात. दुपारी गाव एकदम शांत असते. माणसे शेतात काम करतात. माणसे जनावरांना शेतात चरायला नेतात व त्यांची काळजी घेतात. आम्ही गावात क्रिकेटची प्रॅक्टिस करतो. आम्ही मठावर क्रिकेट खेळायला जातो. जिंकल्यावर आम्ही फीस्ट करतो.

चावडीत, वरातीत लेझीम खेळतात. तळवली नावाच्या विहिरीत टँकरनी पाणी सोडले जाते व माणसे घागरीतून पाणी घरी नेतात. खळोबाच्या सोंडेजवळ सिताफळाची झाडे आहेत व खाली करवंदाची झाडे आहेत. उगळेवाडीत एक सुध्दा दुकान नाही.

एप्रिल महिन्यात आमच्या भैरवनाथाची मोठी जत्रा असते. मुंबईवरून सात बस भरून माणसे येतात. जत्रेत भजी पाव, पेढे यांची दुकाने असतात. खेळणी व फुगे असतात. मी जत्रेत कुस्ती व दांडपट्टा खेळतो. मग मला बक्षीस मिळते. जत्रेत माणसे गुलाल उधळतात व नाचतात.

बघितले आहे तुम्ही हे माझे गाव? तुम्ही पण या आमच्या उगळेवाडीला.



# शकू आणि तिची माय

संजना रिटे

इ. १ ली

शकूची माय कामावरून आली. आज काम खूप होते. माय दमली होती. ती भिंतीला टेकून चटईवर बसली. शकू काचापाणी खेळत होती. ती उठली. शकूने पेलाभर पाणी घेतले. चिमूटभर मीठ घातले. लिंबाची फोड पिळली. सारे नीट ढवळले. सरबत तयार झाले. शकूने सरबत दिले. मायचा थकवा गेला. शकूने एकटीने सरबत केले म्हणून मायला आनंद झाला. मायने शकूला जवळ घेतले. शकू हसली.




संजना रिटे

## किती तरी दिवसांत

किती तरी दिवसांत उंटावर नाही बसले,
कारण उंटच आला नाही
रस्त्यावरून जाताना होतो मला उंटाचा भास
उंटाच्या पाठीवर बसून कधी करू मी प्रवास?
सर्व प्राण्यांमध्ये उंट आहे माझा खास
एकदा तरी भेटेल मजला उंट
आहे मला पूर्ण विश्वास

**ऋतुजा सावंत**
**इ. ३ री**



## मित्र

अविरत माझा मित्र
आम्ही काढतो छान चित्र
वर्गाबरोबर दूर फिरायला जातो
डब्यातला खाऊ वाटून खातो
हवी असते मधली सुट्टी
पण नको असते रविवारची सुट्टी
आम्हाला असली सुट्टी जरी
आठवण येते साऱ्यांची घरी
फोनवरून गप्पा मारतो
शाळेत भेटल्यावर खूप खेळतो.

**अपेक्षा सिधये**
**इयत्ता ४ थी**

## क्रिकेट

चेंडूफळीचा खेळ
कशात नाही कशाचा मेळ
शाळा सुटली की हातात बॅट
अभ्यासाची मात्र लागते वाट
मुले खेळतात दोन टीम पाडून
खेळायला जाताना
आईला सांगतात लाडीगोडी करून

**तन्मय मोरे**
**इयत्ता ४ थी**

# तिळसे

**तन्मय मोरे**


**इ. ४ थी**

सोनाळे गावापासून २ कि. मी. अंतरावर तिळसे हे गाव आहे. तिथून वैतरणा नदी वाहत जाते. तिथे शंकराचे एक मंदिर आहे. देवळाच्या खालीच एक डोह आहे. तिथे खूप मासे आहेत. त्यांना लोक देवमासे म्हणतात. म्हणून त्या माशांना कोणी खात नाही. त्याविषयी लोकांची अशी अंधश्रध्दा आहे की ते मासे मारल्यावरही मरत नाहीत.

तिथे दरवर्षी महाशिवरात्रीची फार मोठी जत्रा असते. तेव्हा लोक माशांना तेलकट खाद्य पदार्थ देत असल्यामुळे खूप मासे मरायचे. पण आता चार वर्षांपासून क्वेस्ट संस्था मासे जगावेत म्हणून प्रयत्न करत आहे. तिथले लोक शिवरात्रीला दिवसभर माईकवरून लोकांना सूचना देतात, पोस्टर लावतात. लोकांनी कचरा डोहात टाकू नये म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी कचरापेट्या ठेवतात. जर काही लोकांनी कचरा पाण्यात टाकला तर जाळीने तो काढून टाकतात. त्यामुळे आता लोकांना समजले आहे की तेलकट पदार्थ माशांचे अन्न नाही. म्हणून आता मासे कमी प्रमाणात मरत आहेत.

संध्याकाळी आम्ही जत्रेत फिरून पेढे, खेळणी, फोटो घेतो. नंतर देवाचे दर्शन घेऊन झाल्यावर घरी येतो.

■



# कोशिंबीर झाली मस्त, मुलांनी केली फस्त

अनुजा अहिवळे

इ. ४ थी

प्रत्येक वर्षी आमचा खाऊ असतो. या वर्षीचा खाऊ होता कोशिंबीर. पहिल्यांदा सर्वांचे ग्रुप केले. मग तन्मयच्या ग्रुपला भल्या मोठ्या कोथिंबिरीच्या पेंड्या धुण्यासाठी दिल्या. नंतर त्यांना ते सर्व निवडायला सांगितले. मग आर्याच्या ग्रुपचा नंबर आला. त्यांना काकडी खिसायला दिली. पण पहिल्यांदा त्या धुवायच्या होत्या. नंतर माझ्या ग्रुपचा नंबर आला. अविरत म्हणत होता आपल्याला काहीतरी चिरायचे काम मिळायला पाहिजे. मग वैष्णवी म्हणाली काही निवडायचे काम नको! पण तेच झाले. ताईंनी आम्हाला भली मोठी पालकची पेंडी दाखवली. अविरत म्हणाला, "आपलं नशीबच फुटकं!" मग नंबर आला आता परीक्षितच्या ग्रुपचा. त्यांना कोबी खिसायला आला. मग ऋतुराजच्या ग्रुपला कांदा व टोमॅटो चिरायला दिले. शिवांजलीच्या ग्रुपला पेरू चिरायला दिला.

आता सगळेजण आपापली कामे करू लागले. ऋतुराजच्या ग्रुपला कांदा चिरायला आला म्हणून सगळे रडत होते. तर शिवांजलीच्या ग्रुपमध्ये चाकू हाताला कापतोय का पेरू चिरतोय हेच बघणे चालले होते. परीक्षित तर विळीवरच बसून कोबी कापत होता. विळीही त्याच मापाची होती. आमची कोथिंबीर निवडून झाली व आम्ही जमा केली. आता आम्हाला पालक निवडायला आली. नंतर ती कापायची होती. अविरत ते पालकाचे पान उचलून म्हणाला, "हा अरबी समुद्र आणि हा बंगालचा उपसागर आणि मधली पालकची सामुद्रधुनी!"

सगळे निवडून, चिरून झाले. सर्वांनी त्यांच्या भाज्या जमा केल्या. मी कोशिंबीर पाहिली. ती इतकी छान दिसत होती! तिला बहुरंगी म्हणायला काहीच हरकत नव्हती. ताईंनी त्यात तांबडे तिखट, फोडणी, दही हे सर्व टाकले. ते मुरण्यासाठी ठेवले. तोपर्यंत आम्हाला भांडी धुवून आणायला लावली. मग सर्वांना गोष्टी ऐकायला दुसऱ्या वर्गात नेले. अरुणाताईंनी आम्हाला छान छान गोष्टी ऐकवल्या. मला त्या खूप आवडल्या. तेवढ्यात दुसऱ्या वर्गात मी, शिवांजली व बुशराने सुवर्णाताईंना एकटेच काम करताना पाहिले. तेव्हा आम्ही तिघींनी ताईंना मदत केली. कांदा कापलेला कचरा उचलला. मग ताईंनी आम्हाला पेरूच्या आतला गर खायला दिला व आम्ही तो खाल्ला.

मधली सुट्टी झाली. ताईंनी आम्हाला एक डबा भरून कोशिंबीर दिली. ती खूप छान झाली होती. मधुराताई कॅमेरा घेऊन आल्या व आम्हा सर्वांचे फोटो काढले. बुशराने खूप छान पोझ दिली. तिची पोझ इतकी मजेदार होती की सगळे हसले.

मला ही कोशिंबीर घरी करायला मिळाली नसती. काकडी कापायला गेले असते तर म्हणाले असते बोट कापेल. म्हणून मी इथेच कोशिंबीर करायची मजा लुटली.

आम्ही ती कोशिंबीर का केली? कारण आमचा अन्न हा धडा चालू होता. त्यावरचा हा छोटासा प्रकल्प. कोशिंबिरीतून आम्हाला लोह, खनिज, साखर, पाणी व गोड आंबट चव हे सर्व मिळाले.

आणि खरेच मज्जा आली! ■



## पाखरांची शाळा

संध्याकाळी तारेवर
रांगेत पाखरं बसतात,
आपल्या गोड आवाजात
दुसऱ्याला बोलावतात,
कधी उंच भरारी घेतात,
कधी झाडावर विश्रांतीला येतात.
एका शाळेतून हा थवा
भरारी घेत येतो,
कणसातील दाणे
फस्त करून जातो.
शेतकरी काका
बुजगावणं लावतो,
गोफण फिरवून पाखरांना बाहेर काढतो.

**परीक्षित विशे**
**इयत्ता ४ थी**

## पतंग

उंच पतंगा
तुला भीती कशी नाही वाटत?
किती उंच उडतोस आकाशात
जवळून आकाश कसं दिसतं?
जातोस किती वर तू मस्त
लागत असेल ना हवा गार?
आम्हाला दिसतोस तू लांबून फार
कशी घेतोस ही भरारी?
इतकी गार हवा न्यारी
आता पतंग तुटला
त्याला मुलांनी लुटला

**ऋतुजा इंगळे**
**इयत्ता ७ बी**


## ह्रदयाला पत्र

***इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञानात ह्रदय या आंतरेंद्रियाचा अभ्यास केला आणि मग ह्रदयास पत्रे लिहिली. त्यातील दोन पत्रे नमुन्यादाखल येथे दिली आहेत.***

ह्रदय म्हणजे आपले जीवन. जर ह्रदयाचे ठोके बंद झाले तर माणूस जगणार कसा? अशा ह्रदयाला आभार व्यक्त करणारे एक पत्र.

प्रिय ह्रदया,

सर्वप्रथम तुला साष्टांग नमस्कार. ह्रदया, तू आमचा खूप महत्त्वाचा भाग आहेस. तुझे पूर्ण शरिराला रक्त पोहोचवण्याचे काम तू नेहमी चालू ठेवतोस. व्यसनामुळे तुला इतका त्रास होता! श्वास घ्यायला येत नाही. अनेक प्रकारचे रोग होतात. तरी मग



माणसे व्यसन करायचे बंद का करत नाहीत हेच मला कळत नाही.

तुझ्यामुळे तर माणसांच्या मनात भावना निर्माण होतात. माणसे अनेक प्रकारचे रोबोट बनवतात. त्या सर्व रोबोटकडे सर्व काही असते. पण फक्त तू म्हणजे ह्रदय नसते. त्यामुळे त्यांच्याकडे भावनाही नसतात. तू तुझी धकधक नेहमी चालू ठेवतोस. कधीच दमत नाहीस. पण जर आम्ही पळलो तर आम्हाला खूप दम लागतो.

बरे! आता माझे पत्र लिहून झाले. आणि माझी एवढीच इच्छा आहे की तू तुझी धकधक कधीच बंद करू नकोस. आता मी हे पत्र पाठवणार आहे. जर तुला पत्र लिहायला वेळ नसेल तर तू तुझे ठोके चालू ठेवलेस तरी मला समजेल की माझे पत्र तुझ्यापर्यंत पोहोचले आहे.

तुझीच,
गायत्री

प्रिय हृदय,


माझा तुला साष्टांग नमस्कार. हृदया, तुला आकुंचन प्रसरण करताना कंटाळा येत नाही का? तुझे टोपण नाव मन आहे ना? तू आमच्या मुठीएवढा आहे ना? तुला माझ्या छातीच्या पिंजऱ्यात बसून गरम होत नाही का? तुलाही माझ्यासारखे बाहेर खेळावे वाटते का? तुला काय माझ्यासारखे खेळावे वाटणार? तू तर आपला आतमध्ये राजासारखा बसला आहेस. असे म्हणल्याबद्दल मला माफ कर. आणि तू आतमध्ये स्वच्छ रहा. म्हणजे माझे मन आरशासारखे साफ राहील. तू मला माझे उत्तर नक्कीच पाठव. मला खात्री आहे की तू माझे उत्तर नक्कीच पाठवशील. धन्यवाद!

अविरत कचर

---

## चंद्राच्या घरी

चंद्राच्या एकदा मी घरी गेलो
तो म्हणाला का इथे आलास?
मी म्हणालो,
असंच आलो.
दोघे बसलो.
फराळ खाल्ला.
खूप खूप खेळलो.
बेडवर लोळलो.
मज्जा केली.
मग हवेत उडलो.
पृथ्वीवर आलो.



अमित कदम
इयत्ता ३ री

# पिताजी को पत्र

**एक बेटी**

आदरणीय पिताजी,

पिताजी मुझे आपकी बहुत याद आती है। क्योंकि आप मुझसे बहुत दूर हैं। पर पिताजी, मुझे लगता है कि मैं जब छोटी थी तब आप मेरी एक-एक अभिलाषा पूरी करते थे।

पर जब शौर्य जन्मा तब से आप मुझे भूल गए। रात-दिन शौर्य से खेलना, उसे बाहर घुमाना, उसकी हर तमन्ना पूरी करना ये आप करते हैं। और जब शौर्य शरारत करता तो आप मुझेही डाँटते हैं। मुझे आप पर बहुत गुस्सा आता है। पर आप मेरे पिताजी हैं। इसलिए मैं अपने दिमाग को ठंडा रखती हूँ।

पिताजी, आप याद करिए, मैं जब पाँचवी कक्षा में थी तब आपने मुझसे एक चैलेंज लगवाया था कि छठी कक्षा तक मेरा अंग्रेजी परफेक्ट होना चाहिए। तो अब आप आकर देखिए, अब मेरा अंग्रेजी परफेक्ट हो गया है।

आपकी प्रिय,
बेटी

---

## फूल

फुलाशिवाय कुठेच नसते सुंदर नक्षी
फुलातला मध पिते मधमाशी

फुलावर बसते सुंदर फुलपाखरू
मध असलेल्या फुलाभोवती
भुंगा लागतो फिरू

पहिल्या नाजूक कळ्या असतात
नंतर रूपांतर होते टपोऱ्या फुलात

फुलांचा राजा गुलाब आहे
तर सारी फुले त्याची प्रजा आहे

फुले आपले मन मोहून टाकतात
त्यांचे वर्णन करायला
शब्द अपुरे पडतात
म्हणून मला फुले खूप आवडतात.

**आर्या पाटील**
**इयत्ता ४ थी**

# डॉल्फिन की सवारी


प्राजक्ता, श्रुती, अभिनव, सोहम

इ. ६ वी

वे गर्मी के दिन थे। यश, काव्या और काव्या की सहेली तन्वी, दादाजी और दादीजी के घर गए थे। एक दिन वे सब जहाज की सवारी करने के लिए गए। जहाज में पहुँचने पर तीनों बच्चे खुश हुए। दादी बोली, "बेटा यश, तेरे दादाजी की पिछली चार पीढियाँ जहाज पर काम करकर देश सेवा करती थी।" दादी की बातें सुनकर यश का मन प्रेरित हुआ। फिर दादी से पूछकर यश तन्वी आरै काव्या को लेकर जहाज देखने चला गया। वहाँ बेडरूम, स्नॅक्स सेंटर, स्विमिंग पूल, पुस्तकालय, म्युझिक रूम और खेलने की जगह बच्चों को बहुत भाई। फिर वे जहाज के सबसे ऊपर वाले बाल्कनी में जाने लगे। सीढियाँ चढते वक्त तन्वी ने वहाँ के खूबसूरत फूल उठाकर अपनी हॅट में लगाए। फिर वे पहुँचे बाल्कनी में। वहाँ पर स्नॅक्स सेंटर था। उन्होंने स्नॅक्स लिए और सागर का दृश्य देखने लगे। अचानक पानी में बुलबुले आने लगे। सब बच्चे आँखे फाडकर देखने लगे। पानी में से एक खूबसूरत डॉल्फिन ऊपर आया और उसने पानी में छलांग लगाई। तीनों बच्चे बहुत खुश हुए। काव्या और यश उसे नजदीक से देखने लगे। काव्या ने अपने स्नॅक्स डॉल्फिन को देने के लिए पानी में फेंके। डॉल्फिन ने स्नॅक्स मुँह में कॅच किए। एक मिनट में खतम! फिर यश और काव्या दादाजी और दादीजी को बुलाने गए। तन्वी ने हॅट के फूल निकालकर डॉल्फिन को दे दिए। डॉल्फिन खुश हुआ। तन्वी उसके और करीब जाने लगी। इतने में उसका पाँव फिसला। वो नीचे गिर गई। डॉल्फिन ने उसे अपने पीठ पर बिठाया और डॉल्फिन बोलने लगा।

"क्या सागर की नीचे की दुनिया देखनी है?" तन्वी ने बिना कुछ सोचे-समझे "हाँ" कहा। फिर वे दोनो निकले सागर की सैर करने के लिए। पानी के नीचे तन्वी को सब कुछ नीला दिख रहा था। डॉल्फिन ने तन्वी को जेलीफिश और ऑक्टोपस दिखाया। उन्हे देखकर तन्वी बहुत भयभीत हो गयी। आगे जाकर डॉल्फिन ने उसे अलग-अलग समुद्री वनस्पति, जलचर दिखाकर उनकी जानकारी बताई। समुद्र के गोल्डफिश, स्टारफिश आदि छोटी मछलियाँ तन्वी को बहुत पसंद आई। फिर तन्वी बोली, "चलो, अब हमें चलना चाहिए। यश और काव्या मुझे ढूँढ रहे होंगे।

कितना अच्छा होता, अगर वे दोनो भी यहाँ आते। पर तुम्हारे पीठ पर हम तीनों नही बैठ सकते।" डॉल्फिन बोला, "तुम चिंता मत करो। मैं मेरे दोस्तों की सहायता लेकर उन दोनों को भी सवारी दूँगा।" फिर तन्वी और डॉल्फिन और दो डॉल्फिन्स को साथ में लेकर सागर के ऊपर गए। डॉल्फिन के दोस्तों के पीठ पर यश और काव्या बैठे। फिर वे सब सागर की सफर करके आए। डॉल्फिन्स ने तीनों को जहाज में छोडा। तीनों बच्चों ने डॉल्फिन्स को शुक्रिया कहा। अब उन्हें पक्का मालूम था कि इस साल साइन्स में वे 'समुद्र' विषय पर प्रोजेक्ट करेंगे, और उन्हें मार्क्स मिलेंगे १००/१००!



# वासाच्या मागावर

अक्षदा फणसे


७ वी

नुकत्याच उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या. आम्ही मामाच्या गावी लवकर जायचं ठरवलं. आमची उन्हाळ्याची कामे जरा लांबणीवर ठेवली. आधी मामाचे गाव व मग उन्हाळी कामे असा आराखडा तयार केला.

मामाचे गाव पुसेसावळी. डोंगरावर वसलेले एक छोटेसे गाव. गावातील ती माणसा-माणसातील आपुलकी, तो जिव्हाळा आदर्श वाटे. पण हक्काने कामे सांगण्याचा व लहान मुलांना चुकले तर ओरडण्याचा अधिकार कोणीच सोडत नसे.

उन्हाळ्याचे दिवस म्हणजे कुरवड्या, पापड या उन्हाळी कामांची लगबग. त्यात ओल्या कुरवड्या व पापडाचे गोळे खाण्यातील मज्जाच काही और असते.

मामाकडे जायचा दिवस उजाडला. आम्ही मामाच्या गावी जायला निघालो. मामीने आम्ही पोहोचल्यावर चपातीचा एक तुकडा ओवाळून टाकला. नंतर गरम गरम



अक्षदा फणसे

चहा केला. तोपर्यंत अपूर्वा, नेहा, सृष्टी, प्राची सगळ्याजणी घरी आल्या. मामी म्हणाली, आज कुरवड्या आहेत म्हणूनच सगळे इथे. "वॉव! कुरवड्या!" मी जोरात ओरडले.

नंतर आम्ही त्या कुरवड्या (ओल्या) खाण्याचा बेत आखला. पण गुपचुप. मामीने आम्हाला चॅलेंज दिला की जर तुम्ही त्या कुरवड्या एका तासात शोधून काढल्या तर मी तुम्हाला १५ ओल्या कुरवड्या देईन. "मंजूर!" आम्ही होकाराने ओरडलो व खेळायला गेलो. दोन तासांनी खेळून घरी परतलो. बघतो तो काय सगळा बेत उरकून मामी बसली होती. आम्ही जेऊन घेतले व मी मामीला म्हटले, "मामी, आता एक तास." मामी म्हणाली ठीक आहे.

मग आम्ही वासाच्या मागावर हे मिशन हातात घेतले व शोधाशोध सुरू केली. काही कळत नव्हते की कुरवड्या ठेवल्यात कुठे. अंगणात पाहिले पण नाही. मग गॅलरीत पाहिले पण तिथे सुध्दा नाही. मग शेवटी कंटाळलो. प्राची म्हणाली आईने आत्ता जरा वेगळ्या ठिकाणी ठेवल्यात कारण आपल्याला शोधायच्यात ना. मग आम्ही विचार करू लागलो की नक्की कुठे ठेवल्या असतील. मग अपूर्वा म्हणाली कॉट खाली. मी म्हणाले, पण कॉटखाली कशा असतील? त्या वाळत ठेवल्या असणार. मग सृष्टी म्हणाली उंबराच्या झाडाखाली. पण नाही, तिथे नेहाने पाहिले होते. फक्त अर्धा तास उरलेला. प्राची म्हणाली, "आता आपण हरणार." मग आम्ही सगळे म्हणालो, "नाही नाही, आपण शोधू." आम्ही परत नीट पाहण्याचा विचार केला.

सगळे परत शोधायला गेले. कोण गॅलरीत, कोण उंबराच्या झाडाखाली, तर कोण अंगणात. परत नीट शोधल्यावर आम्ही शेवटी कंटाळलोच पळून पळून. पाच मिनिटे राहिली. आता काय होणार? अपूर्वा म्हणाली, "तुम्हाला कुरवड्यांचा वास येतोय का कुठून? कदाचित शेजारून. काकूंनी पण केल्यात वाटते. त्या जाऊन खाऊ." आम्ही काकूंकडे गेलो. हे बघा इथे कुरवड्या आहेत. चला काकू नाहीत तरी खाऊ. तसेही भूक लागलीच आहे. आम्ही अवघ्या १५ कुरवड्या खाल्ल्या. तेवढ्यात काकू आल्या. मी काकूंना म्हणाले, "मस्त झाल्यात कुरवड्या." मग काकू म्हणाल्या, "तुझ्या मामीच्याच तर आहेत." तसे आम्ही पळत पळत मामीकडे गेलो व म्हणालो, "आम्ही बरोबर एका तासात त्या कुरवड्या शोधून काढल्या व आमचे मिशन पूर्ण केले आणि १५ कुरवड्या खाल्या. तेव्हापासून आम्हाला दरवर्षी १५ कुरवड्या मिळतात. आता या उन्हाळ्याची वाट बघतोय.

■

# मेरा अविस्मरणीय क्षण

प्रथमेश नलवडे

इ. ८ वी

उस दिन की घटना कुछ इस तरह घटी :

उस दिन सुबह-सुबह ही पापा बहुत गुस्से में थे। वे हमारे दुकान चले गए। हमारी झैरॉक्स की दुकान है। थोडी देर बाद, तकरीबन ११ बजे दुकान से पापा का फोन आया। फोन मैंने ही उठाया। तब भी वह बहुत गुस्से में थे। वह बोले, "जल्दी से यहाँ दुकान पर आओ।" मैंने सोचा मैं तो गया अब काम से। क्योंकि पापा चार दिन घूमने बाहर गए थे, और घूमके आने के बाद पहली बार दुकान गए थे। वे चार दिन दुकान मैंने संभाला था। फिर तो जरूर कोई गडबड हुई होगी। अगर कुछ ऐसा हुआ होगा, तो फिर मुझे दिनभर दुकान में ही काम करना पडेगा। मैं अपनी साइकिल पर दुकान गया। पापा बोले, "इनका काम पूरा करो, मैं खाना खाके आता हूँ।" और पापा चले गए। मैंने काम करना शुरू किया। थोडी देर बाद पापा मेरे छोटे भाई को लेकर दुकान वापस आए। उन्होंने मेरे छोटे भाई से कहा, "तुम भैया की साइकिल लेकर घर जाओ।" मैंने पूछा, "तो फिर मैं घर कैसे जाऊँगा ?" तभी पापा ने कप्यूंटर पर गाना लगाया, 'चलते चलते, मेरे ये गीत याद रखना...'

**मेरा अविस्मरणीय क्षण पान २३ वर**



# नोटेची कमाल

**ऋषिकेश निंबाळकर**

**इ. ७ वी**

उन्हाळ्याच्या सुट्टीत मी माझ्या मामाच्या गावाला म्हणजे वाठार स्टेशनला गेलो होतो. तिथे मी दोन दिवस राहिलो. त्या दोन दिवसांच्या काळात आम्ही खूप खेळलो, मजा केली. मामांचे हॉटेल असल्यामुळे आम्ही त्यातही थोडीफार मदत केली.

त्यानंतर आम्ही मावशीकडे जाण्यास निघालो. आम्हाला घेण्यासाठी माझा मावसभाऊ पण आला होता. तो, मी, माझा लहान भाऊ व मामेभाऊ पैसे घेऊन निघालो. आम्ही बसस्टॉपवर गेलो. तो फलटण-सातारा रोड होता. त्यामुळे सगळ्या गाड्या भरधाव वेगाने जात होत्या. माणसांचीही गाडी पकडण्यासाठी धक्का-बुक्की चालली होती. आम्ही तिकिटापुरते पैसे काढून ठेवले व बाकीच्या पैशांचा खाऊ खाल्ला.तेवढ्यात पुढची गाडी आली. आम्ही घाईघाईने त्यात चढलो.

गर्दी असल्यामुळे कंडक्टरला यायला उशीर झाला. एक किलोमिटर लांब गेल्यावर तिकीट देण्यासाठी कंडक्टर आला. आम्ही तिकिटाचे पैसे देण्यासाठी उरलेले पैसे काढले. पण खिशातून काढताना नोट फाटली. आम्ही तीच नोट कंडक्टरला देण्याचा प्रयत्न केला. पण कंडक्टरने ती नोट घेतली नाही. आम्ही त्याच्याकडे खूप गयावया केली. पण त्याला आमची दया आली नाही. त्याने आम्हाला एस. टी. थांबवून तिठ्यावर उतरवले.

या अनपेक्षित प्रसंगामुळे आम्ही खूप भांबावलो होतो. त्याच भांबावलेल्या स्थितीत आम्ही चालायला लागलो. त्या तिठ्यावर आमचा रस्ता चुकला व आम्ही दुसऱ्या रस्त्याने चालत गेलो. रस्त्याने आम्ही दगड इकडे तिकडे मारत चाललो होतो. त्यातला एक दगड एका कुत्र्याला लागला व ते आम्हाला भुंकायला लागले. आम्ही पळायला लागलो. थोडे पुढे गेल्यावर आम्हाला कळले की आम्ही रस्ता चुकलो आहोत. आम्ही जवळच्या एका घरात चौकशी केली. त्यांनी सांगितले की थोडे पुढे गेल्यावर उजवीकडे जाणारा रस्ता पकडा. तो खूप लांबचा प्रवास होता. पण आम्हाला चालणे भाग होते.

दिवेलागण झाली होती. आम्ही अजून चालतच होतो. पण अचानक लाईट गेली. आम्ही चंद्राच्या अंधुक प्रकाशात पुढे चाललो होतो. रातकिड्यांचा आवाज येत होता. तेवढ्यात आम्हाला एक गाडी दिसली.

आम्ही तिला हात करून थांबवले. ती गाडी थांबली. आम्ही आत बघितले तर पंडित नाना होते. "तुम्ही इथे कसे?" त्यांनी विचारले. आम्ही त्यांना सगळी हकिकत सांगितली. त्यांनी आम्हाला गाडीत बसवले व आमचा जीव भांड्यात पडला.

या १५ मिनिटांच्या प्रवासासाठी आम्हाला तब्बल चार तास लागले होते. त्यामुळे आम्ही खूप दमलो होतो.

आम्ही निघाल्यावर मामांनी फोन करून आधी निघाल्याचे सांगितले होते. आम्ही अजून कसे आलो नाही, या कारणाने घरातील सर्वच चिंतेत होते. आम्ही घरी पोहोचल्यावर सगळ्यांचाच जीव भांड्यात पडला.

■



ऋषिकेश निंबाळकर

# ऱ्हास पृथ्वीचा

**ओंकार मगर**

**इ. ७ वी**

एकदा अचानक सर्व देशांच्या रडार यंत्रणा बंद पडू लागल्या. याचे कारण कुठल्याच देशाला समजू शकले नाही. परंतु दुसऱ्या दिवशी सर्व रडार यंत्रणा परत काम करू लागल्या व अचानक त्यांच्यावर एक संदेश झळकला. तो असा होता, 'तुमचा ग्रह आता आमच्या ताब्यात असून तुमची सर्व दळणवळण यंत्रणा आम्ही लवकरच बंद करणार आहोत. तरी आमच्या काही मागण्या तुम्ही पूर्ण कराव्यात.' हा संदेश वाचल्यावर खरोखरच रडार यंत्रणा बंद पडू लागल्या. मोबाईल, इंटरनेट बंद पडू लागले. सर्वांनाच याची चिंता वाटू लागली की आता आपला ग्रह कुणाच्या तरी ताब्यात खरोखरच गेला आहे व असे घडले तर पृथ्वी नष्ट होण्यास काहीच वेळ लागणार नाही.

परत एक संदेश झळकला तो फक्त काही देशांमध्येच. तो असा होता, 'तुमच्या या पृथ्वीवर आजकाल प्रदूषण खूप वाढले आहे, लूटमार, चोऱ्या यांचे प्रमाणही खूप वाढले आहे. तुमच्या सर्व दळणवळण यंत्रणा आम्ही अशासाठी बंद पाडल्या आहेत की काही लोक या यंत्रणांचा वापर गैरकृत्य करण्यासाठी करतात. कुणालाही धमक्या देणे, एखादा दहशतवादी हल्ला प्लॅन करणे या गोष्टींसाठी दळणवळण यंत्रणांचा उपयोग केला जातो हे योग्य नाही. आमची मागणी ही आहे की तुम्ही प्रथम तुमच्या



ओंकार मगर

ग्रहावरील प्रदूषण व अवकाशीय कचरा कमी करावा. याचा आमच्या ग्रहाला खूप त्रास होतो. हे सर्व करण्यासाठी आम्ही तुम्हाला काही महिन्यांचा कालावधी देतो. ते न झाल्यास आम्ही तुमच्या ग्रहाचा विनाश करू व ग्रहावर कोणताही प्राणी जिवंत राहणार नाही अशी व्यवस्था करू. काही दिवसातच सर्व देश एकत्र आले व

या विषयावर विवाद न करता विचार करू लागले. एकमतातून असे ठरले की सांडपाण्यासाठी ठिकठिकाणी शोषखड्डे करावेत व प्रदूषण नियंत्रणासाठी सार्वजनिक वाहनांचा वापर करावा आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास थांबवण्यासाठी प्रयत्न करावेत. ह्या योजनांची अंमलबजावणी झाली व लवकरच पृथ्वीवर शुध्द वातावरण, खूप प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्ती व दळणवळण यंत्रणेचा योग्य वापर सुरू झाला. यामुळे पृथ्वीवरील वातावरण लवकरच सुधारले. परत त्यांचा एक संदेश आला, 'आमच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी धन्यवाद. अन्यथा तुमचाच ग्रह नष्ट झाला असता. यात आम्ही तुमचेच हित पाहिले आहे. आम्ही शुक्र ग्रहावरून आलो होतो. आता आम्ही निघालो. . .'

■

---

**नको - नको**

चौकामध्ये जावे म्हणते,
ओली भेळ खावे म्हणते.
बाबांजवळ केला हट्ट,
खमंग भेळ केली गट्ट.
दुसऱ्या दिवशी झाले काय?
झोपले घेऊन पोटात पाय.
डॉक्टर डॉक्टर पोट दुखतंय,
सारखं मला रडूच येतंय.
आता घे औषध कडू,
भेळीसाठी पुन्हा नको रडू.
उघडे वाघडे खाणे नको,
असले दुखणे पुन्हा नको.




**श्रीया पाटील**
**इ. ३ री**

# भुतांची पंगत

**राहुल राऊत**


**इ. ७ वी**

माझ्या आजोबांशी एक दिवस ओसरीवर गप्पा मारीत बसलो होतो. लांबवर काहीतरी दिवा किंवा टेंभा खालीवर झाल्यासारखे एकदा-दोनदा दिसले. त्यामुळे ते काय आहे असे आम्ही बघू लागलो. पण आता ते दिसेनासे झाले. "आज तिखडं भुताची पंगत हाय का काय?" आजोबा म्हणाले. मी आश्चर्याने त्यांच्या तोंडाकडे बघू लागलो. काय म्हणाला? भुतांची पंगत? ही कसली असते?

आजोबा सांगू लागले. एकदा दुष्काळ पडला होता. रोजच्या खाण्यापिण्याची मारामार होती. लोकांची उपासमार होत होती. मग माणसांना मटण वगैरे चमचमीत खायला कुठून भेटणार?

लोक म्हणायचे माळावरच्या स्मशानात भुतांची पंगत बसते. तिथे मटण आमूशा-पौर्णिमेला खायला मिळते. त्या दिवशी भुतांकडे पाहुणे भुते येतात. मग सर्वजण आनंदाने शेरीचे टेंभे घेऊन नाचतात. जळते टेंभे फक्त नाचताना वरखाली होताना दिसतात. पण भुते दिसत नाहीत. मग त्यांच्या जेवणांच्या पंगती सुरू होतात.

यावेळी काही माणसेही टेंभे घेऊन गुपचूप यामध्ये सामील होतात. आणि पंगतीत जेवायला बसतात. भुतांच्या पंगतीचेही काही नियम असतात. जेवताना



कोणाशी बोलायचे नाही. ताटातले सगळे संपवायचे. पुन्हा वाढू लागले तर नको म्हणायचे नाही. त्यामुळे लोकही हुशारी दाखवित. ते जेवायला जातानाच भोकाचे ताट घेऊन जात. ताटाखाली खड्डा खोदायचा. सरतेय तेवढे खायचे आणि न सरणारे भोकातून खालच्या खड्ड्यात सरकवायचे आणि हळूच पंगतीतून मागे न बघता गावाकडे सुसाट पळत जायचे. आजोबांचे चुलतेही त्या पंगतीला जेवायला जायचे.

पण आजोबांच्या काळात जसजशी लाईटची सोय झाली तसतशी भुते पांगू लागली का भिऊन स्मशानात बसली?

तुम्हाला काय वाटते? ■

---

## आजी

आजीच्या तोंडात नाही एकही दात
पण आजी म्हणते अजूनही आहे मी तरणीताठ!
आजीचे केस सारे पिकलेले
म्हणूनच असतात सदा पदराने झाकलेले
आजीला आहे गुडघेदुखीचा त्रास
साऱ्या स्नायूंचा झाला आहे आता ऱ्हास
आजीला जेवताना लागते कवळी
नंतरच खाता येते शिजवलेली चवळी
अशी आजी करते सर्वांचा लाड
म्हणूनच आवडते ती सर्वांना फार

**ओंकार मगर**
**इयत्ता ७ वी**

# मासेमारी

**ऋतिक माने**

**इ. ७ वी**

उन्हाळ्याचे दिवस होते. शाळेला सुट्टी होती. काय करायचे? करमत नव्हते. मग आम्ही, म्हणजे मी, रजत आणि रशीकने मासे पकडायला जायचे ठरवले. मासेमारीसाठी आम्ही सगळ्यांनी काठ्या शोधल्या. गळ आणि पाच रुपयाची दोऱ्याची गुंडी आणली. तीच सर्वांनी वापरली. काठीला शिसे लावले. सगळी तयारी झाल्यावर पिशवी घेऊन निघालो.

कॅनॉलच्या शेजारी जी चारी असते त्यातून दानवे मिळतात. ते गोळा केले चिखलातून चालल्यामुळे आमचे हातपाय भरले होते. कॅनॉलवर आलो. गळाला दानवे लावले आणि गळ पाण्यात टाकून बसून राहिलो. सर्वजण आपापल्या गळाकडे पहात होते. आधी कोणाची काठी खाली जाते आणि कोण पहिला मासा काढते आहे याकडे आमचे लक्ष होते. तास गेला



पण मासा नुसता दानवा खाऊन जायचा. आम्ही कंटाळलो आणि ठरवले की कॅनॉल पलिकडे जी विहीर आहे तिथे जाऊन मासे पकडू. त्यासाठी कॅनॉल पोहून पार करायला लागणार होता.

रशीकला पोहायला येत नव्हते. म्हणून आम्ही कपडे काढून त्याच्याकडे दिले आणि कॅनॉल पोहून विहिरीकडे गेलो. कडेवर बसून पाण्यात गळ टाकले. बसलो माश्यांची वाट बघत. तोवर रशीकही कॅनॉलच्या पुलावरून चालत कपडे घेऊन विहिरीकडे आला. हळूहळू पिशवीत मासे जमा होऊ लागले. भरपूर मासे सापडले पण आता अंधार पडू लागला होता. आता जाताना कॅनॉलमधले खेकडे पकडू असे ठरवून आम्ही निघालो.

जाता जाता टायरचे तुकडे गोळा केले. एक काडेपेटी विकत घेतली. तोवर चांगला अंधार पडला. आता टायर पेटवून त्याच्या उजेडात खेकडे पकडायचे होते. पण टायर काही पेटेना. सगळ्या काड्या संपत आल्या. शेवटी थोडी कागदे गोळा केली. ती पेटवली. मग टायरही लगेच पेटला. आम्ही खेकडे पकडायला सुरुवात केली. रशीकने पेटता टायर हातात धरला आणि रजतने पिशवी घेतली. मी भराभर खेकडे पकडायला सुरुवात केली. कारण अंधारात कॅनॉलच्या कडेला खेकडे येऊन बसतात. मी त्यांना पकडून पिशवीत टाकत होतो. पिशवीत टाकण्याआधी नांग्या तोडत होतो. आता पिशवी चांगली जड लागायला लागली.

मग आम्ही घराकडे निघालो. आज खूप मासे आणि खेकडे घावले म्हणून आनंदात होतो. खेकड्याची कढी आणि माश्याचे कालवण खायला मिळणार. भूक लागत होती. घरी पोहोचल्यावर एका परातीत पिशवी रिकामी केली. पाहतो तर काय खेकड्यांनी माश्यांना खाऊन टाकले होते. माशांचे नुसते काटे आणि खेकडे उरले होते.

■

---

**मेरा अविस्मरणीय क्षण पान १५ वरून**

फिर तो मैंने सोचा, की अब मैं घर चलते-चलतही जाऊँगा। और स्कूल भी मुझे चलते चलते ही जाना पडेगा। थोडी देर बाद जब कोई ग्राहक न रहा तब पापा ने दुकान बंद की और मुझे गाडी पर बिठाके कही जाने लगे। मैंने उनसे पूछा, “हम कहाँ जा रहे है?” वे बोले, “जाने के बाद पता चलेगा।” वे मुझे कॅनाल के पार साइकिल की दुकान में ले गए। और वहाँ बोले, “इनमें से कौन सी साइकिल चाहिए तुम्हे?” मैं तो बहुत खुश हुआ। मैंने जल्दी से एक साइकिल चुन ली, और उसी पर बैठकर घर आया।


■

# खारीचे पिलू

मयूर गायकवाड

इ. ८ वी

दसऱ्याचा दिवस. मी, माझा भाऊ व माझी बहीण असे आम्ही तिघेजण सोने वाटायला निघालो होतो. छान गप्पा मारत, चेष्टा मस्करी करत चाललो होतो. इतक्यात एका वळणावर थोडासा चिरका, नाजुकसा आवाज ऐकू आला. चिचुंद्री किंवा असाच एखादा प्राणी असेल असे समजून आम्ही पुढे निघालो. इतक्यात माझ्या बहिणीला एका बंद दुकानासमोर काहीतरी हालचाल जाणवली. तिने थोडेसे पुढं जाऊन पाहिले. आनंदाने व आश्चर्याने ती किंचाळलीच. तिने मला बोलावले. मी आणि भावानेही जाऊन पाहिले तर काय? छोटेसे, नाजुकसे खारीचे पिलू! इतके छोटे पिलू इथे कसे याचे आश्चर्यच वाटले.



आमची पाच ते दहा मिनिटे त्या पिलाचे काय करायचे या चर्चेतच गेली. ते खूप छोटेसे असल्यामुळे त्याला उचलून घेण्याची भिती वाटत होती. असे वाटत होते, की त्याला दुखापत तर नाही ना व्हायची! पण त्याला तिथेच सोडणे अशक्य होते. त्यामुळे मी हलकेच त्याला उचलून घेतले आणि ओंजळीत पकडले. त्याला जास्त जवळून पाहण्याची संधी आम्हाला मिळाली. पुढील पाच मिनिटे त्याच्या निरीक्षणात गेली. त्याने डोळेही उघडले नव्हते. दोन ते तीन दिवसांचे पिलू होते ते. तेवढ्यात त्याने माझ्या हाताचे बोट चाटत भूक लागल्याचे दर्शविले. आता मात्र पटकन काहीतरी निर्णय घेणे गरजेचे होते. आमची चर्चा चालली होती की एक रात्र हे पिलू सांभाळायचे आणि दुसऱ्या दिवशी कात्रजच्या प्राणी संग्रहालयात दाखल करायचे. तेवढ्यात आम्ही ज्या इमारतीखाली उभे होतो तिथल्या एका खिडकीतून एका काकांनी हाक मारली. आणि काय झाले म्हणून विचारले. आम्ही सर्व घटना त्यांना सांगितली आणि आश्चर्य म्हणजे त्या काकांनीही लगेच कात्रजला

जाण्यासाठी त्यांची कार बाहेर काढली. ते काका त्याक्षणी एखाद्या देवदूताप्रमाणे वाटले.

तो एवढासा जीव मी जिवापाड जपत ओंजळीत ठेवलेला. ते पिलूही अगदी निर्धास्त झोपून गेले. आम्ही चौघे गाडीत बसलो आणि गाडी थेट कात्रजच्या प्राणिसंग्रहालयापाशी थांबली. तेथील कर्मचाऱ्यांनी तातडीने पिलाला दाखल करून घेतले. डॉक्टरही त्याला तपासायला आले. त्याच्यासाठी दुधाची सोय करण्यात आली. त्या पिलाची नीट सोय झालेली पाहून आम्ही निर्धास्त होऊन मागे फिरलो.

काकांचा निरोप घेताना त्यांना धन्यवाद दिले तेव्हा त्यांनी आम्हाला मदत करण्याचे जे कारण सांगितले ते ऐकून असे वाटले की या गोष्टीचा सर्वांनी विचार केला पाहिजे. ते म्हणाले, "आजकाल मी खूप माणसे पाहतो, त्यांना भेटतो. पण त्यांच्यातला 'माणूस' मला भेटत नाही. आज तीन माणसे भेटली म्हणून मदत केली."

■

---

**कविता**

अशीच येते कधी कधी
उत्साहाला भरती भारी
आणि मग वाटते करावी
कविता सुंदरशी न्यारी
घेतला लगेच हातात कागद
लिहायला लागले
पटापट पटापट
वाटत होते मला तेव्हा
उंच उडी भरावी
आकाशाला खुणवावे
सारे काही क्षणात एका
बदलूनिया टाकावे
फुलपाखरामागे पळावे
वाऱ्यासंगे गाणे गावे
एक सुंदरसे झाड बनून
इतरांसाठी झिजावे
अशीच गेले घालत
खतपाणी शब्दांना
आणि कधी झाली कविता
मलाच माझे कळेना

**शरयू फणसे**
**इयत्ता ७ वी**

## गप्पांचा अड्डा

विषय वाचून पोटात पडला असेल खड्डा
पण कनिबामध्येही आहे गप्पांचा अड्डा
सर्वांना आहे प्रिय कनिबातील पाईप
पाईपवर गप्पा मारून घडवली अर्धी लाईफ
जिन्यामध्ये गप्पा मारायचा आहे सर्वांना छंद
या गप्पांचा सगळीकडे दरवळतो गंध
पारावरील गप्पांना चढते रंगत फार
त्यांचं त्यांनाच कळत नाही गप्पांचं सार
पाईपवर बसून मुले फुंकतात हुरडे
गप्पा मात्र सुरूच असतात त्यांच्या पर डे
ग्रुप स्टडीच्या नावाखाली जाऊन बसतात जिन्यात
तोंडावर अभ्यास पण गप्पाच असतात मनात
मुलांच्या गप्पा रंगलेल्या असतात छान
शिक्षकांना पाहताच आपोआप उघडते पुस्तकाचे पान
पासआऊट मुले येथे येऊन देतात आठवणींना उजाळा
गप्पांच्या अड्ड्याविना अधुरी वाटेल आमची शाळा

**प्रियांका, समीक्षा, सायली, काजल, रुक्सार, गितांजली**
इ. ८ वी



सायली, काजल

# पूर्व संचित

**प्रथमेश इनामदार**

**इ. १० वी**



सृष्टीच्या चक्रानुसार कोणत्याही सजीवाच्या आयुष्यात जन्म आणि मृत्यू या दोन क्रियांना महत्त्वाचे स्थान आहे. त्यापैकी मृत्यू हे पूर्णत्वाचे तर जन्म हे सृजनाचे प्रतीक आहे. जन्माच्या प्रक्रियेला सृजनाची प्रक्रिया म्हणण्याचे कारण म्हणजे सुरूवातीच्या काळात दिसणाऱ्या मांसाच्या गोळ्याला हळू हळू हात-पाय फुटू लागतात. शरिराचा एकेक अवयव विकसित होऊ लागतो. सृष्टीतील ऊर्जा त्यामध्ये संक्रमित होते. ह्रदयाच्या रूपाने धडधडू लागते. शरिरात चैतन्याचा संचार झाल्यानंतर हा वारू चौखूर उधळू नये म्हणून शेकडो वर्षे संशोधन करून अजूनही थांग न लागलेला, असा मेंदू शरिराचे नियंत्रण करू लागतो. अशा प्रकारे तो मिनी मानव आपले उत्सुकतेने भरलेले डोळे घेऊन या विविधतेने नटलेल्या जगात पाऊल टाकतो.

पण काहींचे पाऊल मात्र माझ्याप्रमाणे मध्येच अडखळते. हे पाऊल अडखळल्यामुळेच आणि जग पाहण्याची जरा जास्तच घाई असल्यामुळे वर म्हटल्याप्रमाणे सृजनाची सर्व प्रक्रिया पूर्ण होण्याआधीच मी या जगात आलो. ही परिस्थिती आई-वडील व नातेवाईक या सर्वांसाठीच आव्हानात्मक होती. कारण माझे कान, नाक हे अवयव अविकसित अवस्थेत होते. माझे एकंदर शरीरही अविकसित होते आणि ज्याला मूल म्हणता येईल असे कुठलेही लक्षण माझ्यात दिसत नव्हते.

त्या परिस्थितीतही आईने खचून न जाता मला वाढविण्याचा निर्णय घेतला. तर माझ्या नाक, कान वगैरे अविकसित असलेल्या अवयवांना कुटुंबीय आकार देण्याचा प्रयत्न करीत होते. किंबहुना केवळ अवयवच नव्हे तर संपूर्ण शरीर व मनाला आकार देण्याची जबाबदारीही कुटुंबियांचीच होती. त्यातही आईचा वाटा मोठा असायचा. ही गोष्ट जरी अतिशयोक्तीपूर्ण वाटली तरी ती खरी आहे.

ही जबाबदारी निभावताना कुणीही तक्रारीचा सूर लावला नाही. माझ्या उज्वल भवितव्याच्या व सर्वांगीण विकासाच्या निर्धारानेच सर्वजण मला घडवण्याचा प्रयत्न करीत होते. आईचे माझ्यावर विशेष लक्ष असायचे.

त्यावेळेस मी डोक्यावर टांगलेला विजेचा बल्ब व गरम पाण्याच्या पिशव्या यांच्या सान्निध्यात होतो. आईने एकदाही पाणी थंड होऊ दिले नाही. त्याप्रमाणेच अंतःकरणातील आत्मविश्वासाची धगही थंड होऊ दिली नाही.

घरातील इतर या ना त्या निमित्ताने घराबाहेर असत. आईचा दिवस मात्र माझ्याबरोबर सुरू होऊन माझ्याबरोबरच संपत असे. रोजचे नित्यकर्म करताना तिच्या लक्षात आले की मुलाच्या विकासाचे मापदंड मानल्या जाणाऱ्या काही क्रिया माझ्या बाबतीत घडत नव्हत्या. सुरूवातीच्या काही दिवसांच्या प्रतीक्षेनंतर मात्र अनेक डॉक्टरांच्या वाऱ्या सुरू झाल्या. याच काळात काही डॉक्टरांनी माझ्या बुध्दिमत्तेविषयी शंका उपस्थित केल्या तर काहींनी मी आयुष्यात काहीही करू शकणार नाही असे सांगितले. एकूणच मला पूर्णतः अपात्र ठरवले. हा असा काळ आई वडिलांसाठी कसोटीचा असायचा. त्यांच्या आत्मिक व मानसिक बळाची परीक्षाच होती ती. कोणी माझ्याविषयी नकारात्मक मत दिल्यावर त्यांच्या डोळ्यापुढे अंधार उभा रहायचा. मन निराशेने ग्रासले जायचे. घरातील एकूण वातावरणावरही या परिस्थितीचे पडसाद उमटत असायचे. वातावरण तणावाने, चिंतेने भरलेले असायचे.

याच निराशेच्या खेळामध्ये कोणीतरी आशादायी अभिप्राय दिल्यावर मात्र घरात

आशेचे स्फुल्लिंग स्फुरत असे.

एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आजूबाजूच्या परिस्थितीची धग आई-वडिलांनी कधीच मला जाणवू दिली नाही. विशेषतः आईने. कारण माझ्या भोवती तिने एक सुरक्षा कवच तयार केले होते.

या सुरक्षा कवचात मी वाढत असताना माझ्यासाठी आईला मात्र दिवसभर एकटीनेच परिस्थितीशी लढावे लागे कारण वडील दिवसभर नोकरीनिमित्ताने घराबाहेर असत.

आई मात्र न डगमगता नव्या दिवसाबरोबर नवी सुरूवात करत असे. ती कायम उत्साहाने, उमेदीने सळसळत असे. माझ्या स्वभावाकडे, जडण-घडणीकडे लक्ष पुरवत असे. माझ्या शारीरिक अवस्थेची जाणीव करून न देता तिने कायम मी सक्षम कसा होईन व माझ्या क्षमतेत वाढ कशी होईल हेच पाहिले. परिस्थिती आपल्या विरूध्द असताना खचून न जाता त्यातून मार्ग कसा काढावा हे आईने माझ्या मनावर बिंबविले. कदाचित माझ्यातील लढाऊ वृत्तीचे बीजारोपण तेथेच झाले असावे.

मला असे वाटते की कोठल्याही अडचणीवर तोडगा काढताना तिचा मूळचाच असलेला आनंदी आणि खेळकर स्वभाव तिच्या मदतीला येत असावा आणि त्यामुळेच ती एखादया गोष्टीचे दडपण न घेता त्यातून मार्ग काढू शकते. याच तिच्या निरागस स्वभावामुळे लोकांशी संवाद साधताना तिला कधीच अडचण येत नाही.

मला शाळेत घालण्याची वेळ आली. पण अनेक अडचणी पुढे उभ्या ठाकल्या. मला बसताही येत नव्हते. माझी आई अवती-भोवती उशा घालून मला बसायला शिकवत असे. पण हे पार्सल काही सरळ बसत नव्हते. शेवटी तिने मला बसायला शिकवलेच. बसण्याशिवाय इतरही अनेक प्रश्न होते. ते म्हणजे मी शाळेत रमेन का? इतर मुलांबरोबर मिसळू शकेन का? पण तिने ते प्रश्न ऑप्शनला टाकून मला अंक ओळख, अक्षर ओळख करून दिली. तिने सांगितलेले मला समजत आहे असे दिसल्यावर तिच्या डोळ्यांच्या कडा पाणावत व चेहऱ्यावर स्मित उमटे. हळू हळू तो दिवस जवळ येत होता. आई माझी मानसिक तयारी करीत होती आणि शेवटी तो दिवस आला. मला काहीतरी वेगळे होत आहे याची जाणीव होती. शाळेत गेल्यावर एकदम नवे चेहरे, नवे वातावरण माझ्या पुढ्यात उभे ठाकले. अशावेळी रडण्याची स्वाभाविक क्रिया करून झाल्यावर मला या नवीन रिश्त्यांचे आकर्षण वाटू लागले. पण आईलाही सोडवत नव्हते. हळू हळू मी शाळेत रमत गेलो. ज्ञान घेत गेलो. मला ते समजत आहे हे पाहून तिलाही समाधान वाटत असे.

मी मुलांमध्ये मिसळत आहे का? शिक्षकांच्या प्रश्नांची उत्तरे देतो आहे का? असे प्रश्न ती रोज शिक्षकांना विचारत असे.

त्यांच्याकडून अनुकूल अभिप्राय मिळाल्यावर पुन्हा नव्या जोमाने ती मला शिकवायला सुरूवात करे. मी आयुष्यात पहिल्यांदाच ओळखीचा परिसर सोडून वेगळ्या जगात रमतो आहे याचे आश्चर्यमिश्रित कौतुक तिला वाटत होते.

असेच दिवस जात होते. आम्हा दोघांनाही आता शाळा अपरिचित राहिली नव्हती. नाही म्हटले तरी आमच्या रोजच्या जीवनात शाळेने मोठा भाग व्यापला होता. मला गुणही बरे मिळत असत.

माझी शारीरिक अवस्था सुधारण्यासाठी फिजिओथेरपी नावाचा उपाय आणला गेला. तसे पहायला गेले तर फक्त हातापायांच्या हालचाली करायच्या असूनही मला याचा प्रचंड कंटाळा असे. कारण शरीर प्रतिसाद देत नसे. आई मात्र अगदी दररोज न चुकता सर्व व्यायाम प्रकार करून घेत असे आणि तिच्यासाठी हे महाकठीण काम असे.

फिजिओथेरपीबरोबरच तिची आणखी एक इच्छा होती. ती म्हणजे मला चित्रकला शिकवणे. पण प्रयत्न करूनही मला ते काही साधत नसे. बहुतेक कुंचला आमच्यावर रूसलेला असावा. कुंचला रुसला पण लेखणी पावली. मला किमान समज आल्यानंतर मी शाळेच्या अभ्यासाबरोबरच इतरही वाचू लागलो. मी जे काही वाचत होतो ते मनाला भिडत होते आणि त्यातूनच मी नकळत लिहायला लागलो.

अगोदर उल्लेखल्याप्रमाणे माझी बौध्दिक व शैक्षणिक प्रगती समाधानकारक असली तरी शरीर मात्र मनाजोगता कौल देत नव्हते. त्यामुळे आम्ही शस्त्रक्रियेच्या निर्णयावर येऊन थांबलो. त्यावेळीही आईनेच मला शस्त्रक्रियेसाठी तयार करण्याचे काम केले. पुढे शस्त्रक्रियेनंतरच्या टप्प्यात दोन अडीच महिने पायाला प्लास्टर असतानाही वॉकरवर चालण्याचा, उभे राहण्याचा सराव करून घेतला. प्लास्टर काढल्यानंतर रोजच्या साध्या-साध्या हालचाली करण्यासाठी काय दिव्यातून जावे लागले ते आठवताना अंगावर शहारे उभे राहतात. या काळात आईने डॉक्टरांचा प्रत्येक सल्ला पाळला. माझ्यात झालेला प्रत्येक बदल तिने माझ्यासोबत साजरा केला. त्यावेळेस तिने दाखवलेल्या धैर्याचा मला आजही फायदा होत आहे. एक प्रकारची आश्वासकता आली आहे.

आज एका विशिष्ट टप्प्यावर आल्यानंतर असे वाटते की एखादा मूर्तिकार ज्याप्रमाणे आपले स्वत्व ओतून मूर्ती घडवण्याचा प्रयत्न करतो, तसेच आई वडिलांनीही आपले स्वत्व पणाला लावून मला घडवले आहे. प्रत्येक वळणावर आकार दिला आहे. हातात काहीही भरीव नसताना केवळ उद्याच्या उज्वल भविष्याच्या आधारावर त्यांनी इथपर्यंतचा प्रवास पूर्ण केला आहे आणि हे निश्चित

निव्वळ पालकत्वाच्या पलिकडचे आहे.

जाताजाता सांगायची एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपला स्वभाव, आपले व्यक्तिमत्व हेच बाहेरच्या जगात आपली आयडेंटिटी असते आणि आईने तर माझ्याबरोबर वावरताना स्वतःची आयडेंटिटीच पुसून टाकली. ही गोष्ट आता मला या लेखाच्या निमित्ताने समजते आहे. हे असे पालक मिळणे हे आपले संचित असते.... पूर्व संचित !

■

---

**दिदी**

माझं आणि भावाचं झालं दिदीशी भांडण
भाऊ चिडून म्हणाला, मी जाईन हां निघून

एके दिवशी लावत होतो आम्ही झाडे
माझी दिदी म्हणाली, चिखलात हात घालू नका वेडे

एके दिवशी करत होतो आम्ही तिघे अभ्यास
आई-बाबा येऊन म्हणाले, मुलांनो शाबास!

एके दिवशी बनवत होतो आम्ही मातीचे पेढे
शेजारचा मुलगा मित्रांना म्हणाला
बघ काय करतात वेडे

दिदी गेली रागात
म्हणाली, हे पडेल हा तुला महागात

तेव्हापासून तो मुलगा नाही जात आमच्या वाटे
दिदी म्हणते, "गेला ना परत वाटे, तर खाशील माझे रट्टे"

तेव्हापासून करत नाही आम्ही तिघे भांडण
ऐकतो दिदीचं, करतो कामही दिदीचं

**अनुजा अहिवळे**
**इयत्ता ४ थी**

# ठशांच्या शोधात

आदिती माने

इ. ८ वी

या वर्षी सगळ्यांच्या सहली जाऊन आल्या. पण आमच्या वर्गाच्या सहलीचे ठिकाण काही नक्की होत नव्हते. २-३ ठिकाणे सांगितली तरी ती मुलांना अमान्यच होती. शेवटी आमची सहल कल्याणीच्या शेतात निरगुडीला जाण्याचे नक्की झाले.

सहल म्हटलं की मौज, मजा, मस्ती हे डोळ्यासमोर दिसू लागते व सहलीच्या आधी बरेच दिवस याची स्वप्ने बघायला सुरूवात झाली. या वर्षीच्या सहलीत आम्हाला वेगळीच मजा येणार होती कारण आम्ही आमच्या सहलीला सायकलवरून जाणार होतो आणि मुक्काम म्हटल्यावर तर काय सगळेजण जय्यत तयारीनिशीच आले होते.

सायकलचा हा प्रवास आम्हाला खूपच सोपा वाटत होता. पण मुलींच्या सायकलचे टायर फुटल्यामुळे २-३ जणांना डबलसीट घ्यावे लागले. त्यामुळे आमचा हा प्रवास पडत धडपडतच चालला होता. फलटण ते निरगुडी हे अंतर आम्हाला आता फलटण-दिल्ली वाटत होते. तिथे पोहोचल्यावर फ्रेश होतो न होतो तोच सर्वांनी क्रिकेट खेळायला घेतले. मोठ्या पटांगणावर क्रिकेटचा खेळ फार काळ टिकला नाही कारण खेळताना नारळाच्या झाडात बॉलच गडप झाला. खेळून दमल्यावर सगळेजण डाळिंबाच्या बागेतून भटकत बसले होते. हळू हळू सूर्य दिसेनासा झाला. सगळेजण खूप लांबपर्यंत भटकत गेले होते. अंधारात सर्वांना शोधताना एकमेकांच्या नावाने मोठमोठ्याने ओरडून आमचे घसे दुखायला लागले. शेवटी एकादाचे सगळे घरी पोचले. त्या दिवशीच्या रात्रीच भारत विरुध्द इंग्लंड २०-२० सामना होता. तो आम्ही सर्वांनी मिळून पाहिला व एन्जॉय केला. अशी एकत्र मॅच पाहण्यात खूप मज्जा असते. खूप एन्जॉय करता येते हे मला माहीत होते पण ते प्रत्यक्षात अनुभवले नव्हते. ते आम्ही तिथे अनुभवले.

नंतर आम्ही गाणी ऐकत बसलो. गाणी ऐकता ऐकता काहीजणांनी नाचायला सुरुवात केली. आम्ही आतापर्यंतच्या कोणत्याच सहलीत नाचलो नव्हतो. त्यामुळे हा आमचा नाच अविस्मरणीय ठरला. आम्ही जवळजवळ दोन तास नाचलो. त्यामुळे आम्ही खाल्लेले सर्व जिरले व आम्हाला भूक लागल्याचे जाणवले. मग सर्वांनी एकत्र डबा खाल्ला व पुन्हा अर्धा



तास नाचलो. निरगुडीचे शेत मुख्य रस्त्यापासून बरेच आत आहे. त्यामुळे तिथे बऱ्याच प्रकारचे प्राणी आढळतात. ते पाहण्यासाठी आम्ही मुली रायफल घेऊन जीपमधून माळरानावरून प्राणी निरीक्षणास अंधाऱ्या रात्रीच निघालो. आमच्या बरोबर कल्पितताताई व काका होते. काकांना तेथील प्राण्यांच्या संपर्कात राहण्याची सवय असल्यामुळे त्यांनी आम्हाला गाडीत शांत राहण्यास सांगितले. तरी गाडीत आमची चुळबूळ तर चाललीच होती. पण हळूहळू बंद झाली. खूप लांबचा फेरफटका मारून आल्यावरही आम्हाला कुठल्याही प्राण्याचे दर्शन झाले नाही. आमच्यानंतर मुले प्राणी दर्शनास गेली. पण त्यांनाही प्राणी दिसले नाहीत. पण मोर व लांडोरीचे आवाज आम्हाला ऐकू येत होते. पण ते नक्की कोणत्या दिशेने येत आहेत हेच आम्हाला कळत नव्हते. त्यामुळे त्याचा नाद सोडून आम्ही झोपायची तयारी सुरू केली.

आसावरीताई व कल्पितताताईंनी आम्हाला झोपायला सांगितले व त्या वरच्या रूममध्ये झोपायला गेल्या. सर्व मुले बाहेरच्या रुममध्ये झोपायला गेली होती. आम्ही सर्व मुली आतल्या रुममध्ये झोपलो. पण झोप कोणालाच येत नव्हती. म्हणून आम्ही आतल्या रुममध्ये गप्पा मारत बसलो. आम्हाला गप्पा मारून कधीच कंटाळा येत नाही. पण तेव्हा आला. तितक्यातच दाराची कडी वाजली. जाऊन पाहिले तर कोणीच नव्हते. पण नंतर कळले मुलेच हा आगाऊपणा करत आहेत. दुसऱ्यांचे घोरण्याचे आवाज ऐकून मध्येच

हास्याचा स्फोट व्हायचा व आम्ही एकमेकींची तोंडे दाबून शांत बसवायचो. इतके हसू यायचे की हसणे आवरणे मुश्किल व्हायचे. खूप धिंगाणा झाल्यामुळे बाकीच्या मुलींनी आम्हाला शांत बसायला सांगितले व आम्ही ४-५ मुली उठून बाहेर गेलो. मुलांना रात्रीची भूक लागल्यामुळे ती डाळिंब खात बसली होती. नंतर आम्ही त्यांच्या गप्पा टप्पांत सहभागी झालो. नंतर गप्पांमधून चेष्टा व चेष्टेमधून धिंगाणा सुरू झाला. तिथे लांडग्याचा वावर होता. त्यामुळे मुले आम्हाला फसवायची लांडगा आला व आम्ही आत पळत जायचो. तीन वाजेपर्यंत आम्ही असाच टाईम पास केला व तीनला झोपलो.

सकाळी सहा वाजता उठल्यावर दात घासून कोवळ्या उन्हात फिरायला गेलो. फिरता फिरता आम्हाला एक ठसा दिसला व त्या ठश्याभोवती सगळे गोळा झाले व कुठल्या प्राण्याचा ठसा आहे याबद्दल कल्पना करू लागले. तो ठसा होता मोराचा. मग सगळेजणच ठश्यांच्या शोधात रमून गेले. ज्यांना वेगळा ठसा दिसेल त्यांनी त्या ठश्याला गोल करायचा व त्याखाली आपले नाव लिहायचे असा आमचा कार्यक्रम चालला होता. इतक्यात कोणीतरी जोरात ओरडले 'नाग' हा शब्द ऐकताच मी तर डोळेच मिटले. कल्पितातार्इंनी पुढे जाऊन पाहिले तर तिथे नाग नसून एक ग्रे कलरचा कागद नागाच्या आकारात उभा होता. सगळे पोट धरून हसू लागले.

आमचा पुढचा दौरा रबर ट्रीवर होता. रबर ट्रीवर आम्ही सगळेच चढून बसलो. सर्वात जास्त वर कोण जाते आहे याची स्पर्धा सुरू होती. सगळेजण झाडावरती माकडासारखे लोंबकळत होते. झाडावर गर्दी झाल्याने ढकलाढकली होत होती व काहीजण धपाधप खाली पडत होते. पण कोणालाच काही दुखापत झाली नाही. नंतर झाडावरची गर्दी कमी झाली व शेवटी झाड रिकामेच झाले. हळूहळू सगळेजण पेरूच्या व चिंचेच्या झाडांकडे वळले. चिंचेच्या झाडावर बसून पेरू खाण्याचा आनंद घेत होते व समोर चाललेल्या लपाछपीच्या डावात ढवळाढवळ करत होते. बराच वेळ गेला तरी चिंचेच्या झाडावरच्यांना उतरू वाटत नव्हते व लपाछपी खेळणाऱ्यांना त्यांचा डाव बंद करू वाटत नव्हता. शेवटी आम्ही खाली उतरून भल्यामोठ्या पटांगणावर मातीत बसलो. इतक्यात आमच्या अंगावर एका बाजूने पाण्याचा फवारा आला. आम्हाला काही क्षण असे वाटले की अचानक पाऊसच आला आहे. पण कल्याणीने पाण्याचा फवारा आमच्या दिशेने वळवल्याने सगळेजण पळत पळत या पाण्याच्या फवाऱ्यात सामील झाले. सगळेजण मस्त पाण्यात भिजले. सगळ्यांचीच आंघोळ झाली. नंतर आम्ही पोट भरून पिठले, भाकरी, कोशिंबीर, भात व मटकी याचे जेवण केले. गरम गरम

जेवणानंतर सगळ्यांची पोटे गच्च झाली होती. नंतर सगळ्यांची निघण्याची तयारी सुरू झाली. कोणाचीच परत जाण्याची इच्छा नव्हती. पण...पुन्हा आमचा 'पडत-धडपडत' प्रवास चालू झाला.

अशाप्रकारे आमची ही अविस्मरणीय सहल संपुष्टात आली. आत्तापर्यंतच्या सगळ्या सहलींना मी गेले होते. पण अशी सहल कधीच एन्जॉय केली नव्हती. ■

---

## धुमारे

सुकलेल्या फांदीवर
नवे धुमारे फुटले
साऱ्या सृष्टीला
आज मातृत्व उमगले
आटलेल्या विहिरीला
आज पाणी गवसले
वाळवंटात जणू
कोवळे अंकुर फुटले
सूर्यप्रकाशात जणू चमकले तारे
वाहू लागले वसंताचे वारे
कोकिळेचे गान ऐकण्या
झाले अधीर मन
घेई भरारी आकाशी
फुलपाखरू होऊन
वसंतात जीवनरस घेती जीव सारे
सुकलेल्या फांदीवरही फुटती धुमारे!

**प्रांजली भुजबळ**
**इयत्ता १० वी**

## रात्र

वर निरभ्र आकाशात चंद्र पेंगतो,
अन् वारा खिडकीतून मंद वाहतो,
स्वप्नी घेऊनी मला जातो.
चमचमणाऱ्या त्या चांदण्या,
स्वप्नामध्ये होती पऱ्या.
बसलेली घुबडे झाडावरची,
दिसतात भुते खरोखरीची.
आणि कुत्री विव्हळू लागता,
घड्याळाची टिकटिक वाढता,
जीवघेणी वाटे रात्रीची भयानकता.
तेव्हा शुभ्र पडलेले ते चांदणे,
वाटते मला आल्हादाचे.
मग पळून जाते माझी भीती,
पेंगलेला चंद्र पण हसतो तेव्हा हर्षुनी

**अक्षता मगर**
**इयत्ता १० वी**

# Snakes

**Gauri Swami**

**8th**

There is a empty space behind my house. There I have seen many snakes. One day Kumbhar aunty told us her experience. One day she woke up at 5 o clock. She started sweeping her house. At that time there was a snake on the window. She didn't see the snake. When she came near the window, the snake came down in front of her. Aunty shouted very loudly. Immediately she called the snake catcher. He caught the snake. He said, ``The snake is Manyar."

Seven days later, after the incident I was cleaning my house. I took dirty water and threw it away at the back space. That time there came a snake. It was very big and black. It had many spots. I called my mother and told her. She called my father. Father came and called the snake catcher. He tried to catch the snake. But he couldn't find it. We tried to search for it. But we couldn't. We were quite frightened . ■



# The Mango Thief

**Aishwarya Teli**

**9th**

Generally everyone likes mangoes. But I like mangoes the most! Every year in summer my grandmother buys mangoes from the market and my mother makes very sweet mango juice. But I like mango pieces more.

This season my mother warned me not to touch the mangoes. "I am going to make mango juice. You will not get any pieces," she said. But could I control myself?

One day I decided to steal a mango. When my mother was resting in the afternoon, I went to the kitchen and took a mango. Then I cut it into pieces and ate them. After that I threw the waste outside the house and washed the dish and the knife. My mother woke up at 5 o'clock. She went to the kitchen and found a mango missing. She asked everyone about the mango. Everyone said, "I don't know."

Every day I would eat one mango without anyone noticing. I know it is wrong but what can I do? I love mangoes so much!

■



# Home Alone

**Rutuja Shinde**

**8th**

I was in the fourth standard. On that day there was a programme at one of our relatives' home. He was very close to us so we had to go for the programme. But I was not ready to miss my school. I said to my father, "I will not come. After school I will go home."

So after the school got over at 5:45, I came home. I played for some time and then completed my homework. I was really bored because I was alone at home. My grandfather and grandmother had also gone for that programme. Then I started the T.V. but there was not a single programme that I liked. I turned off the T.V.

I couldn't decide what to do. I started reading a story book and didn't realise when I fell asleep. I was alone so I had locked all the doors. After some time my mother, father and sister came. They rang the bell and they also called my name. But I was fast asleep. I couldn't hear them.

When I suddenly woke up I didn't know what was happening. Then I could hear my father's voice. I got up and opened the door. When they all came in they were shouting at me. At that point of time they decided that they would never leave me alone at home ever.

Today I am in the eighth class but still my parents don't leave me alone in the house, especially at the night. They have learnt a big lesson from that experience.

■



ऋतुजा शिंदे

# My First Railway Journey

**Kedar Patrekar**

**9th**

That day was a very special day for me. I was going to travel by railway for the first time. The journey was from Lonand to Nagpur. We were going towards Pachmadhi for the adventure sports camp. Pachmadhi is a beautiful hill station in Madhya Pradesh.

At 6 in the evening we reached Lonand station. There was nobody on the platform. Our train's arrival time was 7:30 pm. But it was very late. We sat there for a very long time. At 9.00 I heard the train whistle. Sonwalkar sir said to us, "Be prepared! The train is coming." The train stopped. I saw the name of the train on its front side: Maharashtra Express, Kolhapur to Gondia. We were in the sleeper class. Our Railway bogie number was S5.



We searched for our seats. All the wagons were crowded. Finally we settled on our seats. The train started. We went to see other bogies. There were many students in the train. They too were going to Pachmadhi with us. We asked them about their villages and schools. They all were from Satara district.

Then we returned to our seats. We ate our tiffins and some other snacks. Then we started playing cards. We were enjoying our journey. We were up for a long time. Finally we fell asleep at midnight. There wasn't enough space so two of us slept on the same berth. I slept very well. In the morning we got up very early. I was looking outside the window. Our Maharashtra Express was running towards Nagpur. We passed many cities, villages and junctions. Our train was going through tunnels in mountains and on bridges over rivers. We saw different people on stations with their changing languages, trends and cultures.

I sat near the window and thought about the Pachmadhi camp. Finally we reached Nagpur and the 19 hours of beautiful railway journey ended. In future I will get many chances to travel by train but I will never forget this special journey.

■



A/P 1/1 Relife print [catterpiler.]  S.S. Kakade



A/P 1/1 Relief print (The orange)